**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. विलास वसंत सराफ
नमिता अपार्टमेंट, गावडे कॉलनी, चिंचवड,
पुणे-४११ ०३३ — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, पुणे विभाग, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विभागीय सांखिक, राज्य परिवहन महामंडळ, पुणे विभाग, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७९७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.१२.२००८ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री. विलास वसंत सराफ<br>नमिता अपार्टमेंट, गावडे कॉलनी, चिंचवड,<br>पुणे-४११ ०३३ | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.११.२००६ व १५.३.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.४.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६.४.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

तळेगाव एस.टी. डेपोतील डिझेल खपाबाबतची माहिती आपल्याला जाणीवपूर्वक दिली जात नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री. विलास वसंत सराफ यांनी केली.

जन माहिती अधिकारी तथा विभागीय सांखिक, राज्य परिवहन महामंडळ, पुणे विभाग, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, पुणे विभाग, पुणे या वेळी उपस्थित नव्हते. त्याबाबत दि. १८.१२.२००८ च्या पत्रान्वये आयोगाने त्यांच्याकडून खुलासा मागविला. सुनावणीची सूचना न मिळाल्याच्या कारणावरून उपस्थित राहता आले नसल्याचे विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, पुणे विभाग, पुणे यांनी कळविले.

श्री. सराफ हे तळेगाव आगारात लिपिक पदी कार्यरत असताना उघडकीस आलेला डिझेल भ्रष्टाचार प्रकरणी त्यांना राज्य परिवहन महामंडळाच्या सेवेतून बडतर्फ करण्यात आले असून याबाबतचा दावा कामगार न्यायालयात चालू आहे. सन १९९८ पासूनची माहिती त्यांनी मागितली असून सर्व अभिलेख त्यांना दाखविण्यात आले. तसेच नियमानुसार नष्ट करण्याच्या माहिती व्यतिरिक्तची सर्व माहिती त्यांना देण्यात आली, असे लेखी निवेदन विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, पुणे विभाग, पुणे श्री. यु. ए. काटे यांनी केले. श्री. सराफ यांनी आवश्यक असलेली माहिती सांखिक विभागाकडून देण्यात आला असून तक्रार राहिलेली नसल्याचे त्यांनी दि. १५.१.२००९ रोजी लेखी दिले आहे, असा खुलासा जन माहिती अधिकारी तथा विभागीय सांखिक, राज्य परिवहन महामंडळ, पुणे विभाग, पुणे श्री. अनिल प्रभाकर देशपांडे यांनी दि. १६.९.२००९ च्या पत्रान्वये श्री. सराफ यांच्या संबंधित मजकुराच्या प्रतीसह सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३०.१२.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.विजयकुमार मोतीलाल मर्लेचा
५८०/१-अ/१९-अ, निषीधा सोसायटी,
मार्केटयार्ड, पुणे- ३० **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
पुणे शहर तहसील कार्यालय,खडकमाळ आळी,
पुणे-२ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,
पुणे शहर तहसील कार्यालय,खडकमाळ आळी,
पुणे-२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७९८/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री.विजयकुमार मोतीलाल मर्लेचा
५८०/१-अ/१९-अ, निषीधा सोसायटी,
मार्केटयार्ड, पुणे- ३०

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
पुणे शहर तहसील कार्यालय,खडकमाळ आळी,
पुणे-२ श्री.विक्रांत चव्हाण

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,
पुणे शहर तहसील कार्यालय,खडकमाळ आळी,
पुणे-२ श्रीमती आशा होळकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१७.०१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१६.०३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१८.०४.२००७ |
| ८ | माहिती -मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

तहसीलदार कार्यालयाने कर्मचाऱ्यांच्या संदर्भातील माहिती आपल्याला ६८ दिवस उशिराने दिली. दि.१७.०१.२००७ रोजी आपण माहिती मागितली होती. ती दि.२४.०७.२००७ रोजी दिली. हजेरी पुस्तक अर्धवट भरलेले आहे. निवासी नायब तहसीलदारांच्या नावांच्या पुढे हजेरी भरलेली नाही. हजेरी पुस्तक भरताना कायद्याचे उल्लंघन केले आहे. तहसीलदारांनी त्याकडे दुर्लक्ष का केले? पगार वेळेवर होत नसल्याचे कागदपत्रावरुन सिध्द होते. म्हणजे कामगार कायद्याचे उल्लंघन झाले आहे. अशा प्रकारे अनेक बाबतीत नियमांचे पालन झालेले नसल्यामुळे कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण पडत आहे व नागरिकांची कामे कर्मचारी योग्य प्रकारे मार्गी लावत नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.विजयकुमार मोतीलाल मर्लेचा यांनी केली. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम ४ अन्वये योग्य माहिती प्रसिध्द करावी, अशी मागणी त्यांनी केली.

श्री.मर्लेचा यांचा अर्ज दि.१८.०१.२००७ रोजी प्राप्त झाला. त्या कालावधीत जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार असलेल्या श्रीमती सुचित्रा पाटील दि.२६.१२.२००६ ते दि.०२.०४.२००७ पर्यंत रजेवर होत्या. त्यांचा कार्यभार निवडणूक नायब तहसीलदार श्रीमती शोभा देशमुख यांच्याकडे सोपविण्यात आला. परंतु दि.१९.०१.२००७ ते दि.०३.०४.२००७ या कालावधीत त्या रजेवर गेल्या. त्यामुळे माहिती विहित मुदतीत देता आली नाही. तथापि दि.२४.०४.२००७ रोजी माहिती दिली. श्री.मर्लेचा यांच्या मूळ अर्जानुसार सर्व कागदपत्रांच्या प्रती देण्यात आल्या. मूळ अर्जातील मुद्दे वेगळे असून आयोगाकडील अपिलातील मुद्दे त्यांनी काढलेल्या निष्कर्षांचे आहेत, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पुणे शहर तहसील कार्यालय, पुणे श्रीमती आशा होळकर यांनी केले. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय पुणे शहर श्रीमती शोभा देशमुख यांनी माहिती देण्याबाबत विहित मुदतीत कार्यवाही केली नाही, म्हणून त्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे आदेश तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार श्री.शैलेश सूर्यवंशी यांनी दि.१८.०४.२००७ रोजी प्रथम

अपिलाच्या निर्णयात दिले. त्यानंतर दि.२४.०४.२००७ रोजी माहिती देण्यात आली. मात्र शिस्तभंगाच्या कार्यवाहीबाबतचा प्रस्ताव वरिष्ठांकडे पाठविणे आवश्यक होते. तो पाठविण्यात आलेला नाही असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पुणे शहर तहसील कार्यालय, पुणे श्री.विक्रांत चव्हाण यांनी केले.

शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन, हजेरी आदींची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम ४ अन्वये नागरिकांना नेहमी उपलब्ध असणे आवश्यक आहे. श्री.मर्लेचा यांनी मागितलेली माहिती त्यांना विलंबाने देण्यात आली आहे. श्री.मर्लेचा यांनी उपलब्ध माहितीवरुन काढलेले निष्कर्ष व त्या अनुषंगाने उपस्थित केलेले मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत येत नाहीत. मूळ अर्जानुसार द्यावयाची राहिलेली माहिती आठ दिवसांत अपीलकर्त्यास द्यावी व अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवडणूक नायब तहसीलदार श्रीमती शोभा देशमुख यांनी मााहिती देण्यास झालेल्या विलंबाबत त्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्याच्या आदेशाबाबत तत्कालीन तहसीलदार श्री.शैलेश सूर्यवंशी यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत आयोगाला अहवाल सादर करावा, व श्रीमती देशमुख यांनी विलंबाबात खुलासा करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. तहसीलदार, पुणे शहर श्री.विक्रांत चव्हाण यांनी दि.१७.१२.२००८ च्या पत्रान्वये श्री.सूर्यवंशी व श्रीमती देशमुख यांना आयोगाचे आदेश कळविले. मात्र असा खुलासा अद्याप आयोगाला प्राप्त झालेला नाही, ही गंभीर बाब आहे. त्यामुळे संबंधित कार्यवाहीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१. अपील अंशतः मान्य

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवडणूक नायब तहसीलदार, पुणे शहर तहसील कार्यालय,पुणे श्रीमती शोभा देशमुख यांच्या रजेचा कालावधी लक्षात घेता माहिती देण्यास झालेल्या २१ दिवसांच्या विलंबास त्या जबाबदार ठरतात. आयोगाने संधी देऊनही त्यांनी कोणताही खुलासा केलेला नाही. त्यामुळे त्यांना काहीही म्हणावयाचे नाही म्हणून असे समजून या विलंबाबद्दल त्यांना (२१ x रु.२५० प्रमाणे) रु. ५,२५०/-

शास्ती लावण्यात येत आहे. श्रीमती शोभा देशमुख यांना फेब्रुवारी २०१० मध्ये मिळणाऱ्या जानेवारी २०१० च्या वेतनातून कपात करुन '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा,(१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली शास्तीची रक्कम जमा करण्याची कार्यवाही करावी व याची नोंद त्यांच्या सेवापुस्तक व गोपनीय अहवालात घेऊन त्याच्या छायांकित प्रतींसह अहवाल आयोगाला १५.०१.२०१० पर्यंत सादर करावा.

३. आयोगाच्या आदेशानुसार खुलासा न केल्याबाबत तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पुणे शहर तहसील कार्यालय,पुणे श्री.शैलेश सूर्यवंशी यांना कडक ताकीद देण्यात येत आहे.

४. अपीलकर्त्यांच्या मूळ अर्जानुसार द्यावयाची राहिलेली माहिती देण्याबाबत, तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ च्या अंमलबजावणीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पुणे शहर तहसील कार्यालय, पुणे श्री.विक्रांत चव्हाण यांनी दि.१५.०१.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

पुणे
दिनांक : ३०/१२/२००९

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.काशिनाथ नारायण वेताळ
ज्ञानसंपदा, ५६०/२, जोशीवाडी शिरुर, ता.शिरुर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** चिटणीस,
शिरुर शिक्षण प्रसारक मंडळ, घोडनदी, ता.शिरुर, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याध्यापक,
डॉ.बसू विद्याधाम, लोणीकंद, ता.हवेली, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८०२/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.११.२००९ |
| **३.** | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** श्री.काशिनाथ नारायण वेताळ
ज्ञानसंपदा, ५६०/२, जोशीवाडी शिरुर, ता.शिरुर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी तथा** चिटणीस,
शिरुर शिक्षण प्रसारक मंडळ, घोडनदी, ता.शिरुर, जि.पुणे श्री.तुळशीराम मणीराम परदेशी

**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याध्यापक,
डॉ.बसू विद्याधाम, लोणीकंद, ता.हवेली, जि.पुणे श्री.सुभाष जयवंत वेताळ

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१५.११.२००६ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१२.१.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१२.०१.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१०.०२.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

श्री.काशिनाथ नारायण वेताळ यांनी मागितलेली माहिती अचूक व पूर्ण दिलेली नाही. बँकेतील संयुक्त खाते क्र.९२०, सहलीसंदर्भातील विषय, पालकांकडून घेतलेले शुल्क आदि माहिती दिली जात नाही, असे प्रतिपादन श्री.काशिनाथ नारायण वेताळ यांचे प्रतिनिधी श्री.गोरखनाथ ज्ञानदेव वेताळ यांनी केले.

राज्य माहिती आयोगाकडील अपील क्र.८०३ मध्ये या विषयाचीही सुनावणी झाली होती. ते अपील श्री.संपत माधव त्रिभुवन यांचे होते. त्यावेळीही श्री.गोरखनाथ ज्ञानदेव वेताळ हेच प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. दोन्ही अपिलात वेगळ्या नावाने तेच माहिती मागत आहेत, असे दिसते. संबंधित अभिलेख त्यांना अवलोकनासाठी त्यांना उपलब्ध करून देण्याचे आदेश आयोगाने दिले होते, त्याप्रमाणे त्यांना पाठविलेले पत्र त्यांना मिळाले नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या संयुक्त सहीचे एक वर्षापुरते खाते असते. त्यातील सन २००७ नंतरची माहिती देता येईल. त्यापूर्वीच्या काळातील पासबुक उपलब्ध नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, डॉ.बसू विद्याधाम, लोणीकंद, ता.हवेली, जि.पुणे श्री.सुभाष जयवंत वेताळ यांनी केले. घेतलेल्या शुल्काच्या पावत्या आपल्याकडे असून, हे अभिलेख दहा वर्षापर्यंत जतन करण्याचे आहेत. शाळेने संस्थेला दरवर्षी हिशे दिला असल्याचे मुख्याध्यापकांचे म्हणणे आहे. त्यानुसार रकमेचा आकडा आपल्याला देणे शक्य आहे, तो द्यावा, अशी मागणी श्री.वेताळ यांनी केली. संस्थेला दिलेल्या हिशेबाची कागदपत्रे अपीलकर्त्याला अभिलेखात दाखविता येतील व खाते क्र.९२० ची प्रत देता येईल, असे निवेदन जन माहिती अअधिकारी श्री.सुभाष जयवंत वेताळ यानी केले. त्यानुसार कार्यवाही करण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ नुसार फलक लावले नसल्याची तक्रार श्री.गोरखनाथ ज्ञानदेव वेताळ यांनी केली व त्याबाबतची छायाचित्रे आपण काढली

असल्याचे नमूद केले. श्री.गोरखनाथ वेताळ अनधिकृतपणे संस्थेत येऊन आपल्याला हवी त्या प्रकारची छायाचित्रे घेतात हे अयोग्य वर्तन आहे, असा आक्षेप मुख्याध्यापक यांनी नोंदविला. तसेच कलम ४ नुसार अंमलबजावणी करण्यात आली असल्याचे त्यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. ते लक्षात घेता श्री.गोरखनाथ वेताळ यांच्या याबाबतच्या तक्रारीत तथ्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.११.१२.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रमेश विठ्ठलदास बजाज
१०, आकार मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, नागरी समूह,
पुणे कार्यालय, पीएमटी बिल्डिंग, स्वारगेट, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नागरी समूह,
पुणे कार्यालय, पीएमटी बिल्डिंग, स्वारगेट, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८०८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रमेश विठ्ठलदास बजाज
१०, आकार मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, नागरी समूह,
पुणे कार्यालय, पीएमटी बिल्डिंग, स्वारगेट, पुणे श्री.आर.के.गायकवाड

**जन माहिती अधिकारी** तथा उपजिल्हाधिकारी, नागरी समूह,
पुणे कार्यालय, पीएमटी बिल्डिंग, स्वारगेट, पुणे श्री.भानुदास गायकवाड

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.४.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.४.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२४.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१७.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

मौजे कोथरूड येथे अल्प उत्पन्न गटासाठी मंजूर केलेल्या गृहबांधणी योजनेत विकासक मुथ्था असोसिएटस यांनी सन २००६ पर्यंत केलेल्या कार्यवाहीची कागदपत्रांसह माहिती आपल्याला दिली गेली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.रमेश विठ्ठलदास बजाज यांनी केली.

तीस वर्षापूवीच्या या कागदपत्रांबाबत विहित मुदतीत उत्तर देण्यात आले आहे. मंजूर झ ालेल्या योजनेची सर्व कागदपत्रे अपीलकर्त्याकडे आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, नागरी समूह, पुणे कार्यालय, पीएमटी बिल्डिंग, स्वारगेट, पुणे श्री.भानुदास गायकवाड यांनी केले. श्री.बजाज यांची माहितीची मागणी मोघम स्वरुपाची आहे. नेमक्या कोणत्या प्रकारची व संचिकेची माहिती त्यांना हवी आहे याची विचारणा त्यांना करण्यात आली. सन १९७९च्या योजनेची माहिती त्यांनी मागितली. त्या संदर्भातील दोन संचिकांपैकी एक मागील वर्षी मिळाली व श्री.बजाज यांना दाखविण्यात आली. एक संचिका अद्याप सापडलेली नाही. जानेवारी २००९ अखेरपर्यंत दुसऱ्या संचिकोचा शोध घेत आहोत. तसेच मुथ्था असोसिएटस यांच्याकडेही कागदपत्रांची मागणी करीत आहेत, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, पुणे नागरी समूह, पुणे श्री.आर.के.गायकवाड यांनी केले.

मुथ्था असोसिएटस व निबंधक सहकारी संस्था यांच्याकडून लाभार्थ्यांच्या यादीसह माहिती प्राप्त करून घेऊन अपीलकर्त्यास द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार मुथ्था असोसिएटस यांच्याकडून मागविलेली माहिती श्री.बजाज यांना देण्यात आली असल्याचे संबंधित माहितीच्या प्रतीसह अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, पुणे नागरी समूह, पुणे श्री.आर.के.गायकवाड यांनी दि.२०.२.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.१०.१२.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.पंडित धोंडिबा चव्हाण
बी-३०२, अक्षय गार्डन संभाजीनगर,
अप्पर धनकवडी, पुणे ४११ ०४३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथ** संचालक,
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण),
शासकीय मध्यवर्ती इमारत, पुणे-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा** प्रशासन अधिकारी,
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), शासकीय मध्यवर्ती इमारत, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८२६/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.११.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.पंडित धोंडिबा चव्हाण
बी-३०२, अक्षय गार्डन संभाजीनगर, अप्पर धनकवडी, पुणे ४११ ०४३

**अपिलीय प्राधिकारी तथ** संचालक,
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), शासकीय मध्यवर्ती इमारत, पुणे-१

**जन माहिती अधिकारी तथा** प्रशासन अधिकारी,
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), शासकीय मध्यवर्ती इमारत, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१३.०२.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१२.०३.२००७ व २१.०२.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२८.०३.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.३०.०३.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२७.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१७.११.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सुनावणीला अपीलकर्ता हजर होते. आपल्याला माहिती मिळाली असून कोणतीही तक्रार राहिली नसल्याचे अपीलकर्ता श्री.पंडित धोंडिबा चव्हाण यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

अपीलकर्त्याचे वरील निवेदन लक्षात घेता, आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.११.१२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.जैलाबुद्दीन मिरासाो जाफर
प्लॉट नं.३०, कल्पतरू कॉलनी, न्यू इंग्लिश स्कूलच्या पूर्वेस,
मिरज, ता.मिरज, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, सांगली, मिरज,
कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त, सांगली, मिरज,
कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८४+१८६ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.जैलाबुद्दीन मिरासाो जाफर
प्लॉट नं.३०, कल्पतरू कॉलनी, न्यू इंग्लिश स्कूलच्या पूर्वेस,
मिरज, ता.मिरज, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, सांगली, मिरज,
कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली प्रभारी श्री.वाय.बी.माळी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त, सांगली, मिरज,
कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली श्री.शि.तु.रसाळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.८.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २७.१०.२००६ व १८.११.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.१०.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.११.२००६ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१४.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१२.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

जलनि:स्सारणाच्या मापदंडाबाबतची माहिती जवळजवळ तीन महिन्यांनी (अ.क्र.८४), ड्रेनेज जोडणी संदर्भातील माहिती दिड वर्षांनी(अ.क्र.१८६) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, मिरज, सांगली, कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांनी दिली. विलंबाने माहिती देऊनही ती अपुरी आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.जैलाबुद्दीन मिरासो जाफर यांनी केली.

माहिती देण्यास विलंब झालेला नाही. मूळ अर्जानुसार श्री.जाफर यांना विहित मुदतीत माहिती देण्यात आली. ड्रेनेज कनेक्शन आदिबाबतची काही अतिरिक्त माहिती श्री.जाफर यांनी नंतर मागितली. ती उपलब्ध करून देण्यास विलंब झाला. अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, मिरज, सांगली, कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे अतिरिक्त माहिती देण्याबरोबरच विलंब झाल्यामुळे त्याचे शुल्क रूपये १०२/- त्यांना परत केले. तसेच जागेवर प्रत्यक्ष पाहणी करून तीन ठिकाणी ट्रायल पीट मारून वस्तुस्थिती निदर्शनास आणून दिली. ड्रेनेज कनेक्शन केलेले प्लॉटधारक (२९ व २६) यांच्यापेक्षा श्री.जाफर यांचा प्लॉट फार खोलवर व सर्वात शेवटी आहे. त्यांच्या प्लॉटची पातळी ड्रेनेज लाईनबरोबर जमत नाही, त्यामुळे त्यांच्या घराचे ड्रेनेज कनेक्शन ड्रेनेज लाईनला जोडता येणार नाही. त्याबाबतची सर्व वस्तुस्थिती त्यांना प्रत्यक्ष

दाखविण्यात आली आहे. माहितीच्या अधिकाराखाली वेगवेगळे प्रश्न उपस्थित करून या प्रश्नासाठी ते दिशाभूल करीत आहेत, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, मिरज, सांगली, कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली श्री.शि.तु.रसाळे व अपिलीय प्राधिकारी तथा प्रभारी आयुक्त, मिरज, सांगली, कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली श्री.वाय.बी.माळी यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यांची मागणी माहितीच्या निमित्ताने प्रशासकीय कार्यवाहीची आहे. त्याबाबतही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी कृती केली आहे. हे लक्षात घेता दंडात्मक व अन्य स्वरूपाच्या कारवाईची अपीलकर्त्यांची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपीले निकाली काढण्यात येत आहेतत.

**पुणे**
**दि.२१.१२.२००९**

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. रमेश पंढरीनाथ शिंदे — अपीलकर्ता
मु.पो.पाटण, (मार्केट यार्ड), ता.पाटण,
जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाटण जि. सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मणदुरे, ता. पाटण जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८४ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०.१२.२००८ |
| ३ | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** — श्री. रमेश पंढरीनाथ शिंदे
मु.पो.पाटण, (मार्केट यार्ड), ता.पाटण, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा — गट विकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती,
पाटण जि. सातारा श्री. ए.आर. पाटोळे

**जन माहिती अधिकारी** तथा — ग्रामसेवक, ग्रामपंचायत मणदुरे, ता. पाटण
जि. सातारा श्री. सी. अे. पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.३.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.२.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

मणदुरे ग्रामपंचायतीकडून वाळू व विटांच्या बिलासंबंधीची आपण मागितलेली माहिती हिशोबात असलेल्या गोंधळामुळे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मणदुरे, ता. पाटण यांनी दिली नाही. साडेतीन महिने उलटूनही माहिती मिळत नाही व अपिलीय प्राधिकारी यांनी अपिलाची व तक्रारीची योग्य दखल घेतली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. रमेश पंढरीनाथ शिंदे यांनी केले. संपूर्ण पदभार न मिळाल्यामुळे माहिती देता आली नाही, असे निवेदन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मणदुरे श्री. आर.एम. कणसे यांनी केले. पदभार देताना आपण संपूर्ण माहिती दिली होती. परंतु विद्यमान जन माहिती अधिकाऱ्यांनी ती दिली नाही, असे निवेदन तत्कालीन ग्रामसेवक श्री. व्ही.पी.देसाई यांनी केले.

श्री. शिंदे यांनी यशवंत ग्रामसमृध्दी योजनेच्या संदर्भातील माहिती मागितली होती. त्याबाबतचा पदभार श्री. कणसे व श्री. देसाई यांनी दिला नव्हता, त्यामुळे नोटीस काढून त्यांना बोलावून घेऊन माहिती दिली. संबंधितांविरूध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याचा प्रस्ताव उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांनी दिला आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाटण श्री. ए.आर.पाटोळे यांनी केले. श्री. शिंदे यांचा मूळ अर्ज दि. १३.११.२००६ चा असून दि. २६.२.२००७ च्या पत्रान्वये श्री. व्ही. पी. देसाई (सध्या ग्रामसेवक मेंडोसी, ता.पाटण) यांच्याकरवी त्यांना माहिती पाठविली. माहिती दि. १.३.२००७ रोजी त्यांना प्राप्त झाली, तशी पोहोच दप्तरी आहे, असे नमूद करून अपिलीय प्राधिकारी श्री. ए.आर.पाटोळे यांनी पोहोच असलेल्या पत्राच्या प्रती सादर केल्या.

वरील तपशील लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये विहित मुदतीपेक्षा ७५ दिवस विलंबाने माहिती देण्यात आली. श्री. आर.एम.कणसे व श्री. व्ही. पी. देसाई हे त्यास जबाबदार आहेत, त्यामुळे ते शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२.	अपीलकर्त्यास विहित मुदतीत माहिती न देण्यास जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री. व्ही. पी. देसाई व श्री. आर.एम.कणसे हे जबाबदार असून श्री. व्ही. पी. देसाई यांना रू. १५०००/- (६० दिवस x २५० ) व श्री. आर.एम. कणसे यांना रू. ३७५०/- (१५ दिवस x २५० ) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. शास्तीची रक्कम संबंधितांच्या डिसेंबर २००९ च्या जानेवारी २०१० मध्ये देय असलेल्या वेतनातून कपात करून दि. १५.१.२०१० पर्यंत ००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१) या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाटण, जि. सातारा यांनी करावी. तसेच याची नोंद त्यांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात घेऊन तसा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

पुणे
दि. २१ .१२.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.शरद रामण्णा शेट्टी
प्रेमप्रभा, फ्लॅट नं.१४,
वीरभद्रनगर, बाणेर, पुणे-४५ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निबंधक,
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे-७ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी**
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे-७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८४९/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०३.०३.२००७ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२३.०३.२००७ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३१.०३.२००७ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२५.०५.२००७ |
| ६ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दिनांक २७.०६.२००८ रोजी आयोजित 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'मध्ये या अपीलाचा समावेश करण्यात आला होता. तथापि अपीलकर्ता श्री.शेट्टी गैरहजर होते. त्यामधील प्रपत्रामध्ये व सोबतच्या निवे**दना**मध्ये, श्री.शेट्टी यांनी मागणी केलेली माहिती / कागदपत्रे खूप विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे व उच्च न्यायालयाच्या आणि राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठाच्या अन्य अपिलांमधील आदेशानुसार श्री.शेट्टी यांना सदरची कागदपत्रे तपासणीकरीता

उपलब्ध करुन देण्यात येतील, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी तथा निबंधक, पुणे विद्यापीठ यांनी नमूद केले आहे. आवश्यक तर श्री.शेट्टी यांना त्यानुसार जन माहिती अधिकाऱ्यांशी संपर्क साधून अभिलेख अवलोकन करता येईल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दिनांक : २१/१२/२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.लक्ष्मण बाबूराव मडीवाळ
मु.खटाव, पो.ब्रम्हनाळ, ता.पलूस, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सांगली सहकारी संस्था, जि.सागली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, पलूस, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९३२ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.लक्ष्मण बाबूराव मडीवाळ
मु.खटाव, पो.ब्रम्हनाळ, ता.पलूस, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सांगली सहकारी संस्था, जि.सागली प्रतिनिधी श्री.एस.के.कोलप

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, पलूस, जि.सांगली प्रतिनिधी श्री.बी.एस.बोडरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.१२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ७.१.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.१.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.२.२००९ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१६.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१६.४.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

श्री गणपती पाणीपुरवठा संस्थेच्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने आपण मागितलेली माहिती चुकीची देण्यात आली. त्यामुळे त्याबाबत फेरतपासणी व चौकशी करावी व संस्थेने आपल्या शेताचा पाणीपुरवठा बंद केल्यामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई मिळावी आणि संबंधित अधिकाऱ्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.लक्ष्मण बाबूराव मडीवाळ यांनी केली.

चौकशी अहवालाची प्रत वगळता श्री.मडीवाळ यांनी मागितलेली माहिती श्री गणपती पाणीपुरवठा संस्थेच्या स्तरावरील होती. त्यामुळे ही माहिती त्यांनी संस्थेकडे मागावी व न दिल्यास अपील करावे, असे त्यांना कळविले होते. तथापि, संस्थेकडे माहितीची मागणी न करता अपील केले. चौकशी अहवालाची प्रत देण्याचा आदेश देऊन अन्य मुद्दयांबाबतचे अपील अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सांगली सहकारी संस्था, जि.सांगली यांनी फेटाळले, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पलूस, जि.सांगली यांचे प्रतिनिधी श्री.बी.एस.बोडरे यांनी निवेदन केले. संस्थेकडून माहिती घेऊन त्यानुसार माहितीही श्री.मडीवाळ यांना देण्यात आली, असेही त्यांनी सांगितले. संस्थेच्या दप्तराची फेरतपासणी व कारभाराची

फेरचौकशी करणे, शेताची नुकसानभरपाई मिळणे आदि श्री.मडीवाळ यांच्या मागण्या प्रशासकीय कारवाईच्या असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.११.१२.२००९**